लोकमत

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
## रा.प. अकोला विभाग, अकोला

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये वाशिम, अकोला या दोन जिल्ह्यामध्ये मानद तत्वावर समुपदेशक पदासाठी नेमणुक करण्याकरीता ईच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी दिनांक ०८.१०.२०२५ ते दिनांक २०.१०.२०२५ या कालावधीमध्ये १७.४५ पर्यंत अर्ज पोहोचतील या बेताने विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मंगरूळपीर रोड, अकोला या पत्त्यावर पाठवावे. दिनांक २१.१०.२०२५ नंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

| | |
|---|---|
| शैक्षणिक अर्हता | मान्यताप्राप्त विद्यापीठाची / संस्थेची समाजकार्य याविषयांकीत पदव्युत्तर पदवी [M.S.W] किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची / संस्थेची मानसशास्त्र या प्रमुख विषयातील कला शाखेची पदव्युत्तर पदवी [ M.A. PSYCHOLOGY ] अधिक समुपदेशन मानसशास्त्र विषयातील पदवीका [ ADVANCE DIPLOMA IN PSYCHOLOGY] |
| अनुभव | समुपदेशन क्षेत्रातील शासकीय / निम - शासकीय / मोठ्या खाजगी संस्थामधील किमान २ वर्षांचा अनुभव. |
| इतर अटी व शर्ती | रा.प. महामंडळाच्या विभागामध्ये आवश्यकतेनुसार समुपदेशकांची मानद तत्वावर नेमणूक करण्यात येईल व त्याकरीता मासिक मानधन रू.४०००/- देण्यांत येईल. प्रथम १ वर्षासाठी सदर पदी मानद तत्वावर नेमणुक देण्यांत येईल. सदर काळात केलेल्या कामाचा आढावा घेउन पुढे सदर नेमणुक चालू ठेवायची किंवा नाही हे ठरविण्यांत येईल. |
| कर्तव्य | रा.प. महामंडळातील कर्मचाऱ्यांमध्ये समुपदेशनाव्दारे मानसिक ताणतणावाचे निवारण करणे, त्यांच्याशी वैयक्तीक संवाद साधून अडीअडचणी समजाऊन घेऊन वैयक्तीक पातळीवर निराकरण करणे व आवश्यकता वाटल्यास वरिष्ठ पातळीवर अहवाल पाठवून पुढील उपचाराची गरज निदर्शनास आणून देणे तसेच आगारास महिन्यातून किमान ३ वेळा भेटी देणे. |
| नेमणुकीचा कालावधी | सदर नेमणुक निव्वळ मानद तत्वावर असून नेमणुकीचा कालावधी एक वर्ष राहील. आवश्यकता वाटल्यास समुपदेशकाचा कार्यकाल विचारात घेऊन नेमणूकीचा कालावधी विभागामार्फत वाढविण्यात येईल. सदर नियुक्ती मानद तत्वावर असल्याने रा.प. महामंडळाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमीत सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचे अधिकार / हक्क अर्जदारास/समुपदेशकास नसतील. तसेच सक्षम प्राधिकारी/नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत समुपदेशकाची सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील. |
| अर्ज करण्याची पद्धती | वरील अर्हता प्राप्त करणाऱ्या उमेदवारांचे फुलस्केप पेपरवर अर्ज टंकलिखीत करून स्वतःचा फोटो त्यावर चिकटवावा व अर्जासोबत शाळा सोडल्याबाबतचा दाखला शैक्षणिक अर्हतेबाबत प्रमाणपत्र व अनुभवाचा दाखला जोडावा. सदर अर्ज आपण विभाग नियंत्रक रा.प. अकोला यांचेकडे दिनांक २०.१०.२०२५ पर्यंत पोहोचतील या बेताने पाठवावा. याबाबत अधिक माहितीसाठी विभाग नियंत्रक यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. |

विभाग नियंत्रक
राज्य परिवहन, अकोला